Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 297 – 301
DOI: 10.5281/zenodo.10125180

Original Research Article

# महात्मा गांधीजींची विश्वस्त संकल्पना

प्रा. डॉ. वसंत पांडुरंग सरवदे

विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेव होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव ता. गंगाखेड जि. परभणी ४३१५३६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sarwadevasant@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

सत्य व अहिंसेवर प्रेम करणारे महात्मा गांधी जगप्रसिद्ध आहेत. त्यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी हे होय. महात्मा गांधींचा जन्म काठेवाडात पोरबंदर येथे 2 ऑक्टोबर 1869 रोजी झाला. त्यांचे वडील करमचंद हे पोरबंदर संस्थानचे दिवाण होते. आणि आई पुतळीबेन अतिशय धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. वडील रोज भगवद्गीतेचे पठण करत आणि आई पूजापाठ केल्याशिवाय कधी भोजन करत नसे.बालपणी महात्मा गांधींना काही वाईट मुलांची संगत लागली. परंतु त्यांना अल्पावधीतच आपल्या वागण्याचा पश्चाताप झाला. त्यानंतर त्यांनी सत्संगती कधी सोडली नाही. वडिलांनी आणलेले पितृभक्तीचे नाटक एकाग्रतेने वाचले आणि राजा हरिश्चंद्राचे नाटक पाहिले. हरिश्चंद्राच्या सत्यपालनाचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला. हरिश्चंद्रासारखे आपणही सत्यवादी व्हावे असे त्यांना वाटू लागले. लहानपणी त्यांना भुताची भीती वाटत असे त्यावेळी आईने त्यांना राम नामाचा जप करण्यास सांगितले. पुढील जीवनात फार उपयोग झाला. तसेच तुलसी रामायणाच्या वाचनाने ईश्वरभक्तीची ज्योत त्यांच्या हृदयात प्रचलित झाली.

वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह कस्तुरबांशी झाला. 1885 मध्ये त्यांचे वडील वारले आणि दोन वर्षानंतर ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांच्या वडील भावाने त्यांना बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला पाठवण्याचे ठरवले पण आईची परवानगी नव्हती. मात्र महात्मा गांधींनी मी अमली पदार्थांचे सेवन करणार नाही. अभक्ष भक्षण करणार नाही. परस्त्रीला स्पर्श करणार नाही. असे आईला वचन देऊन ते इंग्लंडला गेले. जून 1891 साली महात्माजी बॅरिस्टर पदवी घेऊन भारतात आले. त्यांनी मुंबई येथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला. मात्र त्यांच्या वकिलीच्या व्यवसायाला फारसे यश

मिळाले नाही. विलक्षण बुद्धिमत्ता असलेल्या गांधींजींना दक्षिण आफ्रिकेतील एका कृष्णवर्णीय व्यापाऱ्याने आपला दावा चालवण्यासाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी दक्षिण आफ्रिकेत नेले. अत्यंत कौशल्याने महात्माजींनी कृष्णवर्णीय व्यापाराला न्याय मिळवून दिला. दक्षिण आफ्रिकेतील एका वर्षाच्या कालावधीत महात्माजींना प्रस्थापित शासनाच्या अन्यायकारक जुलमी धोरणाची माहिती झाली. कृष्णवर्णी यांना न्याय मिळावा या उद्देशाने महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना संघटित केले. प्रस्थापित शासनाच्या विरोधात सत्याग्रह केला. गौरवर्णीयांप्रमाणेच कृष्णवर्णी यांना वागणूक मिळावी यासाठी महात्माजींनी जे कार्य केले ते सुवर्णाक्षरात कोरण्यासारखेच आहे.

गांधींजीनी बुद्धचरित्र आणि भगवद्गीता वाचली. गीतेचे सखोल चिंतन केले व त्यातील विचारांचा त्यांच्यावर सखोल परिणाम झाला. टॉलस्ट्रॉलचे 'वैकुंठ माझ्या हृदयात आहे' नावाचे पुस्तक वाचले. रास्किनचे चे 'सर्वोदय' हे पुस्तक जाणून घेतले. सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण सामावलेले आहे याची त्यांना जाणीव झाली. बौद्धिक शिक्षणापेक्षा त्यांना हृदयाच्या शिक्षणाला म्हणजे चारित्र्याच्या विकासाला प्रथम स्थान दिले. त्यांना सत्याचा आणि अहिंसेचा मार्ग अधिक श्रेष्ठ वाटत होता. हिंसेपेक्षा अहिंसेमध्ये प्रचंड सामर्थ्य आहे याची त्यांना जाणीव होती. त्यांची राहणी साधी होती पण विचारसरणी उच्च होती. त्यांना फिरोजशहा मेहता हिमालयासारखे वाटले, लोकमान्य टिळक समुद्रासारखे व नामदार गोखले गंगेसारखे वाटले.

भारतात मजुरांवर होणारा अन्याय त्यांनी पाहिला व तो त्यांनी दूर केला. सत्याग्रह, सविनय कायदेभंग, शस्त्राशिवाय प्रतिकार, असहकार अशा नवीन साधनांचा पुरस्कार केला. देशातील विषमतेची दरी दूर करण्याच्या उद्देशाने विश्वस्त सिद्धांत मांडला. हिंदू मुसलमान यांच्यातील संबंध चांगले राहावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. जातिभेद त्यांना मान्य नव्हता. त्यासाठी त्यांनी अनेक उपोषणे केली. अस्पृश्यांना 'हरिजन' असे नाव दिले. हे सर्व कार्य ते निस्वार्थ बुद्धीने करत होते. गीतेतील निष्काम कर्मयोग ते आचरत होते. जनतेने त्यांना महात्मा ही उपाधी दिली राष्ट्रपिता म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले.

महात्माजींचे कार्य पाहून स्वातंत्र्यासाठी सारी जनता त्यांच्या मागे उभी राहिली. 1942 साली 'चले जाव', 'भारत छोडो' असे इंग्रजांना त्यांनी ठणकावून सांगितले. भारतीय जनता आता जागृत झाली होती. इंग्रजांनी लाठीमार, गोळीबार केला. अनेकांना तुरुंगात घातले, पण इंग्रजांचे काही चालले नही.1947 ला देश स्वतंत्र झाला. भारताची फाळणी झाली. भारताची फाळणी अनेक लोकांना अयोग्य वाटली. परिणामी एका तरुणाने दिल्लीत गांधीजींना प्रार्थना करीत असताना गोळी मारून ठार केले. गांधीजींच्या मुखात त्यावेळीही 'हे राम' हे शब्द होते. त्यांना हुतात्म्याचे मरण आले. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या त्रिसूत्रीचा पुरस्कार करणाऱ्या महात्मा गांधींना 19व्या शतकातील एक महामानव साऱ्या जगाने मानले. त्यांचा मृत्यू 30 जानेवारी 1948 रोजी दिल्ली येथे झाला.

**महात्मा गांधीजींची विश्वस्त संकल्पना**

'विश्वस्त' ही एक संकल्पना आहे. ज्यावेळी एखाद्या मालमत्तेचे प्रशासन किंवा विनियोग विशिष्ट हेतूने केला जावा असे अभिप्रेत असते, त्यवेळी ज्या व्यक्तीस प्रशासनाची किंवा विनियोगाची क्षमता दिलेली असेल, किंवा सुपूर्द केलेली असेल त्या व्यक्तीस 'विश्वस्त' असे म्हटले जाते. विश्वस्ताचे कर्तव्य हे असते, की ⇨ न्यासाच्या उद्दिष्टांप्रमाणे त्या मालमत्तेचे प्रशासन आणि विनियोग व्हावा.विश्वस्ताचा त्या मालमत्तेवर संपूर्ण ताबा असतो; पण त्या मालमत्तेचे स्वामित्व मात्र त्याच्याकडे नसते. ही मालमत्ता वस्तूच्या स्वरूपात असेल, किंवा पैशाच्या स्वरूपात असेल.

**विश्वस्तकल्पना**

ही अनेक संदर्भात पहावयास मिळते. आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये काही देशांबाबत इतर देशांना विश्वस्त केले गेले. स्वायत्त नसलेल्या प्रदेशांच्या राज्यव्यवस्थेसाठी संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेने केलेली योजना म्हणजे 'विश्वस्त मंडळा' ची (ट्रस्टीशिप कौन्सिल) पद्धती होय. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाने अशा स्वरूपाची महादेश पद्धती (मॅन्डेट सिस्टिम) निर्माण केली, तिचीच विकसित अवस्था म्हणजे, संयुक्त राष्ट्रांनी दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण केलेली आंतरराष्ट्रीय विश्वस्त पद्धती होय. विश्वस्त योजनेखालील प्रदेशांचा प्रत्यक्ष राज्यकारभार जरी निरनिराळया राष्ट्रांकडे सोपविण्यात आला असला, तरी तो संयुक्त राष्ट्रांच्या देखरेखीखाली व संयुक्त राष्ट्रांनी ठरविलेल्या धोरणाप्रमाणे चालविणे, हे त्या राष्ट्राचे कर्तव्य असते.म्हणजेच त्या राष्ट्रांना आपल्या स्वत:च्या राष्ट्रावर जसा सार्वभौमत्वाचा हक्क असतो, तसा हक्क ह्या प्रदेशांबाबत त्यांना नसून, हा कारभार केवळ विश्वस्त (ट्रस्टी) ह्या नात्यानेच करावयाचा असतो.

विश्वस्त योजनेची सुरूवात पहिल्या महायुद्धानंतर झाली; कारण त्या युद्धात पराभूत झालेल्या देशांच्या वसाहतींच्या व्यवस्थापनाचा प्रश्न महत्वाचा होता. त्यांना विजेत्या राष्ट्रांच्या हाती सोपविण्याऐवजी राष्ट्रसंघाने या देशांसाठी महादेश पद्धती सुरू केली. राष्ट्रसंघाच्या सनदेमध्ये (अनुच्छेद २३ व) याबाबतची तरतूद करण्यात आली. संयुक्त राष्ट्रांनी मान्य केलेली सध्याची विश्वस्त म्हणजे याच संरक्षणव्यवस्थेची विकसित अवस्था होय. तसे पाहिले तर, विश्वस्ताची कल्पना १८८५ च्या बर्लिन परिषदेत मांडण्यात आली होती, कारण परतंत्र वसाहतीत राहणाऱ्या लोकांच्या विकासाचा प्रश्न काही लोकांना महत्वाचा वाटला. १९३० साली आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने (आय्‌एल्‌ओ : इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन) परतंत्र देशांतील जनतेच्या विकासाचा प्रश्न हाती घेतला पाहिजे, असे मत व्यक्त केले होते.

संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाल्यानंतर (१९४५) जुन्या संरक्षणयोजनेत सुधारणा करण्याचे ठरले, कारण राष्ट्रसंघाचे याबाबतचे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत. फ्रान्स आणि इंग्लंड या संरक्षक राज्यांनी आपली जबाबदारी नीट पार पाडली नाही. म्हणून संयुक्त राष्ट्रांनी महादेश पद्धतीऐवजी 'विश्वस्त मंडळ' स्थापन करण्याचे ठरवले. त्याबाबतची तरतूद संयुक्त राष्ट्रांच्या घटनेच्या अनुच्छेद ७३ मध्ये केली आहे. परतंत्र देशातील जनतेचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय विकास घडवून आणण्यासाठी काही विकसित राष्ट्रांनी त्यांचे विश्वस्त म्हणून काम करावे आणि त्यांना स्वातंत्र्याच्या

मार्गास लावून द्यावे, अशी त्यामागची कल्पना होती. संयुक्त राष्ट्रांनी विश्वस्त योजनेचे काम पार पाडण्यासाठी विश्वस्त मंडळ नावाची एक कायम स्वरूपी यंत्रणा स्थापन केंली. संयुक्त राष्ट्रांच्या घटक संस्थांपैकी ती एक संस्था आहे.

विश्वस्त मंडळाकडे विश्वस्त प्रदेश म्हणून पुढील तीन प्रकारचे प्रदेश सोपविण्यात आले: (१) पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाच्या देखरेखीखाली असलेले बहुतेक सर्व प्रदेश (नामिबिया वगळून), (२) दुसऱ्या महायुद्धकाळात दोस्त राष्ट्रांनी जिंकून घेतलेले प्रदेश आणि (३) स्वतंत्र राष्ट्रांनी स्वेच्छेने विश्वस्त मंडळाकडे सुपूर्द केलेले प्रदेश. हे सर्व प्रदेश विश्वस्त मंडळाकडे सुपूर्द करण्याचा मुख्य उद्देश भाषा, धर्म, वंश इ. भेद न बाळगता त्या प्रदेशांतील लोकांना मानवी हक्क आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांना स्वशासनासाठी लायक बनवणे हे होते.

संयुक्त राष्ट्रांच्या घटनेतील तरतुदींप्रमाणे विश्वस्त योजनेखाली असणाऱ्या प्रदेशांना विश्वस्त मंडळाच्या काही सभासदांकडे राज्यकारभारासाठी सोपवले जाते. विश्वस्त मंडळाची रचना पुढीलप्रमाणे असते : (१) ज्या राष्ट्रांकडे हे प्रदेश कारभारासाठी सोपविण्यात आलेले आहेत ती विश्वस्त राष्ट्रे, (२) संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे पाच कायम सदस्य, (३) संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने दर तीन वर्षांसाठी निवडलेली प्रतिनिधी राष्ट्रे.

विश्वस्त मंडळ विश्वस्त योजनेखाली असणाऱ्या प्रदेशांच्या प्रगतीबाबतचे अहवाल तपासणे, तक्रारींची चौकशी करणे, प्रदेशांची पाहणी करण्यासाठी शिष्टमंडळ पाठवणे, अर्ज-विनंत्यांचा विचार करणे इ. कामे करते. विश्वस्त मंडळाच्या सभासद राष्ट्रांना प्रत्येकी एक मत असते आणि निर्णय बहुमताने घेतला जातो. मंडळाची बैठक वर्षातून दोनदा होते.

आरंभीच्या काळात एकूण अकरा वसाहतींना विश्वस्त योजनेखाली ठेवण्यात आले होते. दरम्यानच्या काळात सु. ५० पेक्षा जास्त देश स्वतंत्र झाले आणि आता फक्त एक-दोनच प्रदेश विश्वस्त मंडळाकडे आहेत. बहुतेक विश्वस्त प्रदेशांना टप्प्याटप्प्याने स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

विश्वस्त पद्धतीमुळे जुन्याच साम्राज्यवादी देशांना त्यांच्या वसाहतीवर राज्य करण्याची संधी मिळाली आणि त्यांनी त्याचा गैरवापर केला, अशी टीका केली जाते; पण बहुतेक वेळा विश्वस्त पद्धतीखाली असणाऱ्या देशांना या योजनेचा फायदा झाला आणि त्यांना स्वातंत्र्य मिळाले, ही गोष्ट अमान्य करता येत नाही.

'विश्वस्त' ही गांधीवादी अर्थव्यवस्थेतील एक महत्वाची संकल्पना आहे. ⇨ महात्मा गांधीनी श्रीमंतांनी संपत्तीचे विश्वस्त व्हावे; स्वामी होऊ नये, अशी कल्पना मांडली होती. याचा अर्थ श्रीमंतांनी आपली मालमत्ता लोकहितार्थ वापरावी; केवळ स्वत:च्या उपभोगासाठी वापरू नये, असे त्यांना अभिप्रेत होते. माणसाने आपल्या गरजा किमान ठेवाव्यात, या तत्वज्ञानाला अनुसरून त्यांची विश्वस्ताची कल्पना होती. सन्मानाने जगण्यास लागणाऱ्या संपत्तीपेक्षा जेवढी जास्त संपत्ती असेल. त्यावर श्रीमंतांनी हक्क सांगू नये; त्या संपत्तीवर समाजाची मालकी असावी व ती समाज्याच्या कल्याणासाठीच वापरली जावी, असे म. गांधींना वाटत होते. या भूमिकेमागे आर्थिक समतेचे तत्व होते. भांडवलदार, संस्थानिक, जमीनदार ह्यांनी विश्वस्त कल्पना अंमलात आणल्यास समाजातील विषमता नष्ट होईल. या कल्पनेनुसार

भांडवलदार स्वत:हून कारखान्यावरील मालकी हक्क सोडून देऊन विश्वत म्हणून भूमिका बजावतो व कामगारही मालकाच्या बरोबरीने विश्वस्त बनतात. या मार्गाने भांडवलशाहीचे रूपांतर समतेवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत होईल, असे म. गांधींचे मत होते. मात्र धनिकास आपल्या संपत्तीवरील हक्क सक्तीने, बळीने वा हिंसक मार्गाने सोडावयास न लावता त्याचे हृदयपरिवर्तन करून त्यास त्यागास प्रवृत्त केले पाहिजे. त्यातूनही कारखानदार विश्वस्ताची भूमिका अमान्य करू लागल्यास अहिंसक असहकार पुकारावा, असे म. गांधींनी सुचवले. विश्वस्त वृत्ती ही माणसाच्या मूलभूत चांगुलपणावर व सत्प्रवृत्तीवर भर देणारी नैतिक संकल्पना असून, तिचा उगम प्युरिटन धर्ममतामध्ये आहे. जगातील यच्चयावत वस्तूंवर अखेर परमेश्वराचीच सत्ता आहे; माणसाला त्याने फक्त उपजीविकेचाच अधिकार दिला आहे, अशी ही धारणा होती. म. गांधींनी बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उदघाटन प्रसंगी १९१६ सालच्या फेब्रुवारी महिन्यात जे भाषण केले, त्यात त्यांनी विश्वस्त वृत्तीचा प्रथम उल्लेख केला. संस्थानिकांनी आपणास प्रजेच्या संपत्तीचे विश्वस्त मानून तिच्या कल्याणासाठी राज्याच्या उत्पन्नाचा विनियोग करावा, असा सल्ला त्यांनी त्या भाषणात दिला. म. गांधींचे सहकारी किशोरलाल मशरूवाला, नरहरी पारीख व प्यारेलाल यांनी ही संकल्पना स्पष्ट करण्याच्या उद्देशाने आपापसांत चर्चा करून एक मसुदा १९४२ साली स्थानबद्ध असताना तयार केला व म. गांधीनी त्यात इष्ट ते योजना प्रसिध्द करण्यात आली. म. गांधीप्रणीत सर्वोदयाच्या तत्वाज्ञानात आर्थिक व सामाजिक समतेला प्राधान्य आहे आणि त्यासाठी विश्वस्तकल्पना आधारभूत मानली आहे.

अशाप्रकारे समाजातील सामाजिक विषमतेची दूरी दूर व्हावी या उद्देशाने महात्मा गांधींनी ही विश्वस्त संकल्पना त्यांनी मांडली आणि ती प्रत्यक्षात सर्वांनी तिची अंमलबजावणी करावी आणि संपूर्ण समाज एक समान व्हावा या उद्देशानेच ही विश्वस्त संकल्पना राबवावी अशा प्रकारचे विचार त्यांनी मांडले आहेत.

**संदर्भ सूची**

१. महात्मा गांधीजींचे विचार
२. मराठी विश्वकोश खंड - 16
३. आर्थिक विचारांचा इतिहास - बीबी इंगळे 2011
४. आर्थिक विचारांचा इतिहास - ए. आर. रायखेलकर 2005
५. आर्थिक विचारांचा इतिहास - बी.बी.इंगळे.